# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** बीड **P.S.(ठाणे):** वडवनी
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0085 **Year (वर्ष):** 2026
**Date and Time of FIR (प्र. ख. दिंनाक आणि वेळ):** 19/05/2026 00:27

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** सोमवार **Date From (दिंनाक पासून):** 18/05/2026
**Time Period (कालावधी):** पहर 6 **Date To ( दिंनाक पर्यंत):** 18/05/2026
**Time From (वेळेपासून):** 15:06 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 16:22 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिंनाक ):** 19/05/2026 **Time (वेळ):** 00:06 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 002
**Date & Time (दिंनाक आणि वेळ):** 19/05/2026 00:06 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
उत्तर, 10 किमी **Beat No. (बिट क्र.):**
(b) **Address (पत्ता):** जयसु नाईक तांडा चौक ,वडवणी

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** समाधान बळीराम कवडे

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1984

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | लाचलुचपत प्रतिबधक विभाग ,बीड ,बीड शहर,बीड,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | लाचलुचपत प्रतिबधक विभाग ,बीड ,बीड शहर,बीड,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):** पोलीस अधिकारी

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-9890904274

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | क्रष्णा आश्रुबा पाळवदे | | | 1. गणेश आघाव यांचे घरी,किरायने पंचशिल नगर,परळी,संभाजी नगर,बीड,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विंलबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | लाच रक्कम 500/ रुपये दराच्या 02/ नोटा | 1,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**
(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

1,000.00

11. **Inquest Report / U.D. case No., if any**
(इन्कवेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12. **First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

फियाद

दिनाक 19/05/2026

मी समाधान बळीराम कवडे, वय-42 वर्षे, व्यवसाय-नौकरी, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिंबधक विभाग
बीड मो.न.9890904274.
समक्ष सरकारतर्फे फिंयादी होऊन पो.स्टे.वडवणी येथे हजर येवून फिंयाद देतो की, मी लाचलुचपत प्रतिंबधक
विभाग बीड येथे दि.09/06/2025 पासून पोलीस निरीक्षक म्हणून कार्यरत आहे.
मी दि.18/05/2026 रोजी ला.प्र.वि.बीड येथे हजर असतांना श्री.सोपान चिट्टमपल्ले, पोलीस उप अधीक्षक, ला.प्र.
वि.बीड यांनी त्यांचे कक्षामध्ये बोलावले त्यावेळी आम्ही श्री.सोपान चिट्टमपल्ले यांचे कक्षामध्ये गेलो असता कक्षामध्ये
एक व्यक्ती व श्री.सोपान चिट्टमपल्ले हे हजर होते. त्यावेळी श्री.सोपान चिट्टमपल्ले यांनी सदर व्यक्ती हे तक्रारदार असुन
त्यांचे नाव अंगद भारत तिडके, वय-32 वर्ष, व्यवसाय-शेती, रा.मौजे चिंचवडगाव ता.वडवणी जि.बीड असा परिचय
करुन दिला व त्यांची एका लोकसेवका विरुध्द तक्रार असुन त्यांची सविस्तर लेखी तक्रार घेवून पुढील कार्यवाही
करावी असे सांगीतले. त्यावरून आम्ही मा.तहसिलदार, बीड यांचेकडून दोन शासकीय पंच कर्मचारी उपलब्ध करुन
घेतले. त्यानंतर मी व तक्रारदार असे आम्ही माझे कक्षामध्ये आलोत. त्यावेळी तक्रारदार यांनी स्वहस्ताक्षरात त्यांची
तक्रार दिली की, " माझी मौजे चिंचाळा ता.वडवणी जि.बीड येथे गट क्रमांक 309 मध्ये माझ्या नावे 56 आर शेत
जमीन आहे. सदर जमीनमध्ये माझ्या मालकीचा बोअरवेल आहे. त्या बोअरवेलसाठी मागेल त्याला सौर कृषी पंप
योजने अंर्तगत मी 20 मार्च 2026 मध्ये ऑनलाईन अर्ज केला होता. त्याचा लाभार्थी क्रमांक MT442200
0920539 असा आहे. माझा सौर कृषी पंपाचा अर्ज मंजुर झाल्यानंतर मी त्यासाठी 21982/- रुपये एवढी रक्कम
ऑनलाईन भरलेली आहे. सदरचा सौर कृषी पंप मिळणेसाठी शेतात बोअरवेल असल्याचा सर्वे वायरमन यांचेकडुन
करुन घेणे अर्निवाय असले बाबत मला आज दिनांक 18/05/2026 रोजी सकाळी 09.00 वा. चे सुमारास 33
के.व्ही.सबस्टेशन कुप्पा येथील वायरमन कृष्णा पाळवदे साहेब यांनी फोन करुन कळविले आहे. तसेच सर्व्हे करुन
देण्यासाठी मला 1000/- रुपये दयावे लागतील असे सांगीतले" अशी वगैरे मजकुराची तक्रार दिल्याने त्याची तक्रार
पंचासमक्ष घेवुन तक्रार व कागदपत्रावर आम्ही, पंच व तक्रारदार यांनी सहया केल्या.
त्यानंतर लाचलुचपत प्रतिंबधक विभाग, बीड येथुन आम्ही स्वत:, पोह/शेळके, पोह/काचगुंडे, पोशि/गवळी,
चापोह/म्हेत्रे व दोन्ही पंच असे सापळा कारवाईसाठी लागणाऱ्या आवश्यक त्या साहित्यासह शासकीय वाहनाने रवाना
होवुन चिंचाळा ते खापरवाडी रोड लगत चिंचाळा शिवार येथे सुरक्षीत ठिकाणी हजर आलोत व तक्रारदार हे
त्यांचेकडील मोटार सायकलने सुरक्षित ठिकाणी हजर आले. तक्रारदार श्री.अंगद तिडके यांचे तक्रारीचे अनुषंगाने दि.
18/05/2026 रोजी आम्ही लोकसेवक श्री.पाळवदे हे तक्रारदार यांचेकडे सौर कृषी पंप मिळणेसाठी शेतात
बोअरवेल असल्याचा सर्वे करण्यासाठी लाचेची मागणी करतात किंवा कसे ? याबाबत तक्रारदार व पंच क्र.1 श्री.
पवार यांना लोकसेवक श्री.पाळवदे यांची भेट घेण्यासाठी पाठविण्यात येणार असल्याचे सांगीतले. त्यावेळी तक्रारदार
यांनी विंनती केली की, वायरमन श्री.पाळवदे यांच्या भेटीचे ठिकाण निश्चित करण्यासाठी त्यांना फोन करुन विचारावे
लागेल असे सांगीतले. त्यावेळी आम्ही पंचाना कळविले की, तक्रारदार हे लोकसेवक श्री.पाळवदे यांना फोन करुन
त्यांच्या भेटीचे ठिकाण निश्चित करणार आहेत. सदरचा कॉल व्हॉईस रेकॉर्डर मध्ये रेकॉर्ड करण्यात येणार असल्याचे
सांगीतले. त्यानंतर तक्रारदार यांनी त्यांचे मोबाईल वरुन वायरमन श्री.पाळवदे यांना कॉल केला असता, त्यांनी कॉल
रिसिव्ह केला नाही. त्यानंतर लागलीच वायरमन श्री.पाळवदे यांनी त्यांचे मोबाईल वरुन तक्रारदार यांना फोन करुन
दुकडेगाव फाट्यावर असल्याचे सांगुन कुठे येवू असे म्हणाले. त्यावेळी तक्रारदार यांनी चिंचाळा ते खापरवाडी रोडवर
आवघड बुवा दर्गा जवळ बोलावले. त्यानंतर आम्ही तक्रारदार व पंच क्र.1 श्री.पवार यांना आवघड बुवा दर्गा जवळ
पाठवुन लाचमागणी पडताळणी करण्यात येणार असल्याचे सांगीतले. त्यानंतर आम्ही तक्रारदार व पंचांना लाचमागणी

पडताळणीचे अनुषंगाने योग्य त्या सुचना देऊन व्हाईस रेकॉर्डर बाबत सविस्तर माहिती देण्यात आली. त्यानंतर व्हाईस रेकॉर्डर तक्रारदार यांचे बनियानचे डावे बाजुस छाती लगत सुरक्षीत बांधुन व्हाईस रेकॉर्डर चालु करुन तक्रारदार व पंच क्र.1 श्री.पवार यांना लोकसेवक श्री.पाळवदे यांची भेट घेण्यासाठी आवघड बुवा दर्गा जवळ 15.18 वा. तक्रारदार यांचे कडील मोटारसायकलने रवाना केले. त्यानंतर तक्रारदार व पंच क्र.1 श्री.पवार हे त्यांचेकडील मोटार सायकलने 15.49 वा. चिंचाळा ते खापरवाडी रोडलगत चिंचाळा शिवार येथे सुरक्षीत ठिकाणी परत आले. त्यानंतर आमचे सुचनेवरून पोशि/गवळी यांनी व्हाईस रेकॉर्डर बंद करून ताब्यात घेतला. त्यावेळी आम्ही पंच क्र.1 श्री.पवार व तक्रारदार यांना स्वतंत्रपणे विचारपुस करून व्हाईस रेकॉर्डरमध्ये रेकॉर्ड झालेले संभाषण ऐकले असता, तक्रारदार व पंच क्र.1 श्री.पवार यांची लोकसेवक श्री.पाळवदे यांचेशी आवघड बुवा दर्गा जवळ भेट झाली व त्यानंतर तक्रारदार यांचे सर्व्हे गट क्रमांक 309 मधील बोअरवेलचा सर्व्हे करणे करीता शेतामध्ये गेले. त्यावेळी लोकसेवक श्री.पाळवदे तक्रारदारास तिथेच केला असता, एवढया लांब यायची काय गरज असे म्हणाले त्यावर तक्रारदार यांनी जिओ टॅगला पुन्हा अडचणी यायच्या असे सांगुन वर नमुद सर्व्हे क्रमांक मधील बोअरवेलचा सर्व्हे करण्यास सांगितले. त्यानंतर वायरमन श्री.पाळवदे यांनी तक्रारदार यांचे शेतामधील बोअरवेलचा सर्व्हे करतांना ऑनलाईन कोणाकडे केले असे विचारले. त्यावेळी तक्रारदार यांनी घोलप यांचेकडे ऑनलाईन केले असल्याचे सांगीतले. त्यादरम्यान वायरमन श्री.पाळवदे यांनी "संघर्ष लय कराय लावला..काय पचणारयत तुमचे 1000/- रुपये " असे म्हणुन 1000/- रुपये लाचेची मागणी करुन " कॅश आहेत का ऑनलाईन आहेत " असे विचारले असता, तक्रारदार यांनी " कॅश देतो ना..चलाना गावात देतो ना " असे म्हणाले. त्यावेळी लोकसेवक श्री.पाळवदे हे त्यांचेकडील मोटार सायकलने व तक्रारदार व पंच हे तक्रारदार यांचेकडील मोटार सायकलने चिंचाळा गावात गेले. त्यावेळी तक्रारदार यांनी मोटारसायकल उभा करुन " सर थांबा आं, मी आलो दोन मिनीटांत बसा सर " असे म्हणाले त्यावेळी लोकसेवक श्री.पाळवदे यांनी चिंचाळा गावात थांबुन 1000/- रुपये लाच रक्कम स्विकारण्याचे मान्य केले.

लाचमागणी पडताळणी वरुन लोकसेवक श्री.पाळवदे यांचे विरुध्द चिंचाळा येथे लाचेच्या सापळ्याचे आयोजन करण्यात येणार असल्याचे तक्रारदार यांना सांगितले त्यावरुन चिंचाळा ते खापरवाडी रोडलगत चिंचाळा शिवार येथे सुरक्षीत ठिकाणी शासकिय वाहनामध्ये पंचासमक्ष आम्ही तक्रारदार व दोन्ही पंचांना अँथ्रासीन पावडर व अल्ट्राव्हायलेट लॅम्प यांचा उपयोग व गुणधर्म सांगुन कृत्रीम अंधारात त्याचे प्रात्यक्षीक करुन दाखवुन तक्रारदार यांनी हजर केलेल्या ज्यामध्ये 500/-रु दराच्या 02 नोटा असे एकुण 1000/- रुपये लाच रककमेस अँथ्रासीन पावडर लावली व सदरची लाच रक्कम ही तक्रारदार यांचे पॅन्टचे समोरील उजवे बाजुचे खिशात ठेवली. तक्रारदार यांना लाच स्वीकृती नंतर करावयाचा ईशारा" डोक्यास बांधलेला गमज्या काढुन डाव्या हातामध्ये घेण्याचा " इशारा नेमुन दिला व वेळे अभावी लागलीच सापळा कारवाईचे आयोजन करुन लाचमागणी पडताळणी, सापळापुर्व व यशस्वी सापळा कारवाईचा पंचनामा सापळा कारवाई झाल्यानंतर एकत्रीत करण्यात येणार असल्याचे आम्ही पंच व तक्रारदारास सांगीतले.

सापळापुर्व कारवाई पुर्ण झाल्यानंतर आम्ही तक्रारदार, दोन्ही पंच व सापळा पथकास सापळा कारवाईचे अनुषंगाने सुचना दिल्या. त्यानंतर व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन तक्रारदार यांचे बनियानचे डावे बाजुस व्हाईस रेकॉर्डर सुरक्षीत बाधुन ते चालु करुन तक्रारदार व पंच क्र.1 श्री.पवार यांना लोकसेवक श्री.पाळवदे यांची भेट घेवुन लाच रक्कम देण्यासाठी मौजे चिंचाळा येथे 16.07 वा. रवाना केले. त्यांचे पाठोपाठ आम्ही, पंच क्र.2 श्री.गायके व सापळा पथक असे शासकीय वाहनाने रवाना झालो. तक्रारदार व पंच क्र.1 श्री.पवार हे मौजे चिंचाळा येथे चौकामध्ये थांबले व तक्रारदार हे फोन वर बोलत असतांना दिसत होते. त्यानंतर तक्रारदार व पंच क्र.1 श्री.पवार हे चिंचाळा गावातुन पुढे निघाल. त्यावेळी आम्ही त्यांचे मागे जावून काही अंतरावर त्यांना थांबवुन त्यांचेकडील व्हाईस रेकॉर्डर बंद केला. त्यावेळी तक्रारदार यांनी आम्हाला सांगीतले की, लोकसेवक श्री.पाळवदे हे जयसु नाईक तांडा येथे गेले असुन त्यांनी मला जयसु नाईक तांडा चौकात बोलावले आहे असे सांगीतले. त्यानंतर आमचे सुचनेवरून पोशि/गवळी यांनी व्हाईस रेकॉर्डर लागलीच चालु केले व तक्रारदार व पंच क्र.1 श्री.पवार यांना जयसु नाईक तांडा येथे तक्रारदार यांचे मोटार सायकलने रवाना करुन त्यांचे पाठोपाठ आम्ही, पंच क्र.2 व सापळा पथक असे शासकीय वाहनाने रवाना झालोत. त्यानंतर तक्रारदार व पंच क्र.1 श्री.पवार हे जयसु नाईक तांडा चे चौकामध्ये लोकसेवक श्री.पाळवदे यांची वाट पाहत थांबले. त्यानंतर काही वेळाने एक व्यक्ती मोटार सायकलने जयसु नाईक तांडाच्या चौकामध्ये तक्रारदार यांचे जवळ आला. त्यानंतर तक्रारदार व त्या व्यक्ती मध्ये चर्चा झाली. चर्चे दरम्यान तक्रारदार यांनी त्यांना नेमून दिलेला इशारा 16.21 वा. केला.

त्यानंतर माझे सुचनेवरून सापळा पथक तात्काळ सक्रिय होवून पंच क्र.02 श्री.गायके यांचे सह जयसु नाईक तांडा चौकामध्ये हजर आलोत. आमचे सुचनेवरून पोशि/गवळी यांनी तक्रारदार यांचेकडील व्हाईस रेकॉर्डर ताब्यात घेवून

बंद केला. त्यांनतर मी, पंच क्र.01 श्री.पवार यांना लाचेची रक्कम कोणी मागीतली व कोणी स्विकारली असे विचारले असता पंच क्र.01 श्री.पवार यांनी तेथे हजर असलेल्या एका इसमाकडे अंगुली निर्देश करुन हेच ते लोकसेवक श्री. पाळवदे असुन त्यांनी तक्रारदार श्री.तिडके यांचेकडुन उजवे हाताने लाच रक्कम स्विकारुन त्यांनी अंगावर परिधान केलेल्या पॅन्टच्या पाठीमागील उजव्या बाजुच्या खिशामध्ये ठेवली असे सांगीतले. त्यावेळी आम्ही लोकसेवक श्री. पाळवदे यांना माझी, दोन्ही पंचाची व सापळा पथकाची ओळख करुन दिली. त्यांनतर लोकसेवक श्री.पाळवदे यांना त्यांचे नाव, गाव व पत्ता विचारले असता त्यांनी त्यांचे नाव कृष्णा आश्रुबा पाळवदे, वय-33 वर्ष, व्यवसाय-नौकरी, वरिष्ठ तंत्रज्ञ, म.रा.वि.वि.कं. मर्यादीत तेलंगाव उप विभाग अंतर्गत कुप्पा गाव जि.बीड रा.मौजे मोहा ता.परळी जि. बीड ह.मु.गणेश आघाव यांचे घरी किरायाने, पंचशिल नगर, परळी वै.जि.बीड (वर्ग-4) असे सांगितले. त्यानंतर आम्ही लोकसेवक श्री.पाळवदे यांना लाच रक्कमेबाबत विचारणा केली असता त्यांनी लाच रक्कम अंगावर परिधान केलेल्या पॅन्टचे पाठीमागील उजवे बाजुचे खिशात असल्याचे सांगीतले. त्यानंतर आम्ही पंच क्र.2 श्री.गायके यांना लोकसेवक श्री.पवार यांनी परिधान केलेल्या पॅन्टचे पाठीमागील उजवे बाजुच्या खिशातुन लाच रक्कम बाहेर काढुन ताब्यात घेऊन खात्री करण्यास सांगीतले. त्यावरुन पंच क्र.2 श्री.गायके यांनी लाचरक्कम ताब्यात घेतली व पंच क्र.1 श्री.पवार यांनी लाचेच्या नोटांचे वर्णन व क्रमांक नमुद असलेला कागदावरील नोटांचे क्रमांक पंच क्र.2 श्री.गायके यांना वाचुन दाखवले असता पंच क्र.2 श्री.गायके यांनी लाचेच्या नोटांची खात्री करुन सापळापुर्व कारवाई दरम्यान नमुद केलेल्या नोटांशी तंतोतंत मिळुन आल्याचे सांगीतले. त्यानंतर आम्ही लाच रक्कम 1000/- रुपये पंच क्र.2 श्री. गायके यांना पुढील सुचनेपर्यंत ताब्यात ठेवण्यास सांगीतले. तसेच लोकसेवक श्री.पाळवदे यांना मागेल त्याला सौर कृषी पंप योजने अंतर्गत करण्यात येणाऱ्या सर्वे बाबत माहिती विचारली असता, त्यांनी नमुद योजने अंतर्गत लाभार्थ्यास सौर कृषी पंप मंजुर झाल्यानंतर संबंधीत शेतकऱ्याच्या शेतामध्ये प्रत्यक्ष जावून शेतात बोअरवेल अथवा विहीर आहे का याबाबत सर्वे करुन तसा अहवाल ऑनलाईन सबमिट केला जातो असे सांगीतले. तसेच यातील मुळ तक्रारदार श्री.तिडके यांचे शेतजमिनीतील बोअरवेलसाठीच्या सौर कृषी पंपाचा सर्वे श्री.अंकुश व्हरकटे, वरिष्ठ तंत्रज्ञ, उपविभाग तेलंगाव अंतर्गत वडवणी यांचे आयडीवर आलेला असुन श्री.व्हरकटे यांनी त्यांचा आयडी व पासवर्ड लोकसेवक श्री.पाळवदे यांना दिला असुन श्री.व्हरकटे यांचे सांगणेवरुन सदर आयडी व पासवर्डचा वापर करुन लोकसेवक श्री.पाळवदे यांनी सदरचा सर्वे केल्याचे सांगीतले.

त्यानंतर घटनास्थळावरील प्राथमिक कारवाई पुर्ण करुन पुढील कारवाई लाचलुचपत प्रतिबधक विभाग, बीड येथे पुर्ण करण्यात येणार असल्याचे सांगीतले. त्यानंतर आम्ही, दोन्ही पंच, सापळा पथक, लोकसेवक श्री.पाळवदे असे घटनास्थळावरून रवाना होवून लाचलुचपत प्रतिबंधक विभाग बीड येथे शासकीय वाहनाने हजर आलोत. तसेच तक्रारदार हे त्यांचेकडील मोटार सायकलने रवाना होवून ला.प्र.वि.बीड येथे हजर आले. तसा एकत्रीत लाचमागणी पडताळणी, सापळापुर्व व यशस्वी सापळा कारवाईचा पंचनामा लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बीड येथे केला आहे. तरी दि.18/05/2026 रोजी 15.06 वा. ते 16.22 वा. सुमारास यातील मुळ तक्रारदार श्री.अंगद भारत तिडके, वय-32 वर्ष, व्यवसाय-शेती, रा.मौजे चिंचवडगाव ता.वडवणी जि.बीड यांची चिंचाळा शिवारातील सर्व्हे क्रमांक 309 मध्ये 56 आर शेत जमीन आहे. सदर जमीनीमध्ये बोअरवेल आहे. त्या बोअरवेलसाठी मागेल त्याला सौर कृषी पंप योजने अंतर्गत तक्रारदार यांनी ऑनलाईन अर्ज केला होता. त्याचा लाभार्थी क्रमांक MT442200 0920539 असा आहे. तक्रारदार यांचा सौर कृषी पंपाचा अर्ज मंजुर झाल्यांने सदरचा सौर कृषी पंप मिळणेसाठी शेतात बोअरवेल असल्याचा सर्वे करुन घेणे करीता वरिष्ठ तंत्रज्ञ श्री.कृष्णा पाळवदे यांनी तक्रारदार यांना 1000/- रु. लाचेची मागणी करुन लाच रक्कम 1000/- रु. लागलीच स्विकारण्याचे मान्य करुन 16.21 वा. जयसु नाईक तांडा चौकामध्ये लाचरक्कम 1000/- रु. स्विकारले असता लोकसेवक श्री.पाळवदे यांना लाचेच्या रकमेसह पकडले म्हणुन माझी लोकसेवक श्री.कृष्णा आश्रुबा पाळवदे, वय-33 वर्ष, व्यवसाय-नौकरी, वरिष्ठ तंत्रज्ञ, म.रा.वि.वि.कं.मर्यादीत तेलंगाव उपविभाग अंतर्गत कुप्पा गाव जि.बीड रा.मौजे मोहा ता. परळी जि.बीड ह.मु.गणेश आघाव यांचे घरी किरायने पंचशिल नगर, परळी वै.जि.बीड (वर्ग-4) यांचेविरुध्द कलम 7 भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम 1988 प्रमाणे फिंयाद आहे.

माझी वरील फिंयाद ही माझे सांगणे प्रमाणे संगणकावर टंकलिखीत केली असुन ती बरोबर व खरी आहे.
ही फिंयाद दिली सही

(समाधान कवडे)
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिंबधक विभाग, बीड.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

Varsha Pandurang Vhagade(I (Inspector)) / API **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.** (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

पोलीस ठाणे अंमलदार
पोलीस स्टेशन, पडघा

**Registered by** (नोंदणी अधिकारी)

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name (नाव):** Varsha Pandurang V
**Rank(पद):** I (Inspector)
**No.(सं.):** API

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):